# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०८/२०२२** **दिनांक २६.०८.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१९८२/२०२२, दि.१८.०८.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.२६.०८.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.ना.श्री.आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.ना.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष**
**२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा. अनुराधा गोविंदराव आदिक, सदस्य**
**४. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य**
**५. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**६. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य**
**७. मा.श्री. रराहुल नारायण कनाल, सदस्य**
**८. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**९. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य**
**१०. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**११. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**
**१२. मा.श्रीमती मिना शेखर कांबळी, सदस्य**
**१३. मा.श्री.सुनिल सदाशिव शेळके, सदस्य**
**१४. मा.श्री.सुभाष दिगंबर लाखे, सदस्य**
**१५. मा.डॉ.जालिंदर बालाजी भोर, सदस्य**
**१६. मा.श्री. दत्तात्रय पांडूरंग सावंत, सदस्य**
**१७. मा.श्री.सचिन पाराजी कोते, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

समिती सदस्य मा.अनुराधा गोविंदराव आदिक, मा.श्री. रराहुल नारायण कनाल, व मा.श्रीमती मिना शेखर कांबळी हे सभेस ऑनलाईन उपस्थित होते.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

---

**विषय नं.०१** **दि.२०.०७.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४७१** **दिनांक २०.०७.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.४४०- यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३०.०६.२०२२ रोजीचे उपसमिती सभेमधील उपरोक्त १ ते २७ मुद्दयांपैकी ज्या बाबींवर प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करणे शक्य आहे, त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी. व उर्वरीत मुद्दे स्थगीत ठेवण्यात येऊन नंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुन:सादर करण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

**या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**निर्णय क्र.४४०- यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३०.०६.२०२२ रोजीचे उपसमिती सभेमधील उपरोक्त १ ते २७ मुद्यांपैकी अ.नं.१ ते १८ बाबत प्रोत्साहन भत्त्याचे दर निश्चीत होईपावेतो कार्यवाही स्थगीत ठेवण्यात यावी. तसेच अ.नं.१९ ते २७ बाबत प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०२** **दि.२२.०७.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उप समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४७२** **दिनांक २२.०७.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

१. **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांच्या भूसंपादन प्रकरणांपैकी एलएक्यु/एसआर/०४/२००७, एलएक्यु/एसआर/०७/२००७ तसेच शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी. रुंदीकरण संबंधीत भूसंपादन एलएक्यु/एसआर/२१/२००३ या भूसंदर्भ दाव्यात मा.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,राहाता यांचे न्यायनिर्णयाच्या आधारे परिगणीत केलेल्या वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणेकामी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०३.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७६ अन्वये मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आलेला असुन शासनाची मान्यता मिळाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

२. **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यापैकी एलएक्यू/ एसआर / ०७/२००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूसंदर्भ क्रं.३८/२०१२ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाप्रमाणे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे ठराव, मा.छाननी समितीचे ठराव व शासनाची मान्यता या माहितीसह सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावा, तसेच सदर भुसंपादन प्रकरणांमध्ये वाढीव भूसंपादनाची रक्कम संस्थानमार्फत आदा करणेबाबत प्रस्तावामध्ये प्रशासनाने स्पष्ट अभिप्राय नमुद करावा. व नव्याने छाननी समिती (Scrutiny Committee) स्थापन करुन त्यांचेकडे ठराव पाठवून मग त्यांचे मान्यतेने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१.** **संस्थानचे १२५ वाहने, विद्युत विभाग जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन पुरवठयाबाबत स्वयंपुर्ण होणेकरीता अंतर्गत इंधन व्यवस्था सुरु करणेबाबत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर विषयावर मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशावरुन धोरणात्मक निर्णय व आर्थिक बाबतीत निर्णय घेणे उचित नाही. सदर विषय हा धोरणात्मक आहे किंवा कसे हे प्रशासनाने स्पष्ट अभिप्राय देऊन तसेच संस्थानचे कर सल्लागार यांचा अभिप्राय देऊन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** **(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

विषय नं.०३ दि.३०.०७.२०२२ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या मा.उपसमिती सभेबाबत.

निर्णय क्र.४७३ दि.३०.०७.२०२२ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या मा.उपसमिती सभेमध्ये खालील प्रमाणे अ.नं.१ ते ४ विषय सादर करण्यात आले होते.

१. रुग्णालयातील विविध कामकाजासाठी सॉफ्टवेअर प्रणाली बाबत चर्चा करणे.

---

२. साई दर्शनास येणा-या भक्तांना प्रसादाचे वाटप करणे.

---

३. संस्थानचे १२५ वाहने, विद्युत जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन पुरवठयाबाबत स्वयंपुर्ण होणेकरीता अंतर्गत इंधन व्यवस्था सुरु करणेबाबत.

---

४. संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यापैकी एलएक्यू/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूसंदर्भ क्रं.३८/२०१२ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाप्रमाणे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं.१ ते ४ हे विषय धोरणात्मक स्वरुपाचे असल्याने तसेच मा.व्यवस्थापन समितीचे संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता आजची सभा तहकुब करण्यात यावी, असा निर्णय सर्व उपस्थित सदस्यांचे वतीने घेण्यात आला.
आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

---

विषय नं.०४ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असणा-या मशिनरी/उपकरणे खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.४७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असणा-या मशिनरी/ उपकरणे खरेदी करणेकामी समिती सदस्य मा.डॉ.जालिंदर भोर यांचेकडून सविस्तर माहिती घेऊन फेरप्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०५ महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत रुग्णांवर संपुर्ण उपचार झाल्यानंतर विमा कंपनीने नामंजूर केलेल्या बिलांच्या रकमेस वैद्यकीय सवलत देऊन बिले सेटल करणेबाबत.

निर्णय क्र.४७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हास्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत रूग्णांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. दि.०१/०७/२०१७ पासून शासनस्तरावर या योजनेच्या नावात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना असा बदल करण्यात आलेला आहे. त्यानुसार या योजनेअंतर्गत दि.०३/११/२०१७ ते दि.३१/१२/२०२१ पर्यंतच्या कालावधीतील १३ रूग्णांच्या नामंजूर झालेल्या रू.९,८८,५२७/- रकमेस सोशल वर्कर विभागामार्फत वैदयकीय सवलत करून वित्त विभागामार्फत रक्कम नावे टाकण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत रूग्णांच्या यापुढे अशा प्रकारे विमा कंपनीकडून नामंजूर होणा-या रकमेस सोशल वर्कर विभागाकडून सवलत करण्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारात मंजूरी मिळण्यास व बीले सेटल करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०६ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६३,२३,३०५/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुन-२०२२ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६३,२३,३०५/-मात्रची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०७ ठेकेदारामार्फत कार्यरत कुशल कंत्राटी कर्मचारी (ज्युनिअर लॅब टेक्निशियन, सी एस एस डी टेक्निशियन व ज्युनिअर एक्स रे टेक्निशियन) यांचा पॅरामेडीकल कर्मचारी यांचेप्रमाणे पगारवाढ मिळणेबाबतचे अर्जाबाबत.

निर्णय क्र.४७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदारामार्फत कार्यरत कुशल लॅब असिस्टंट, ज्युनिअर एक्स रे टेक्निशियन, सीएसएसडी टेक्निशियन व बायोमेडीकल टेक्निशियन यांना उपरोक्त तक्त्यातील अ.नं. २ मध्ये नमुद केल्यानुसार कुशल फार्मासिस्ट यांना देण्यात येत असलेल्या वेतनाप्रमाणे वेतन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यानंतर अशा प्रकारचे कुशल कर्मचारी यांनी विनंती अर्ज सादर केल्यास त्याची पडताळणी करून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रस्तावात नमुद केलेनुसार वेतन तरतुदीनुसार अदा करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आरएमओ/सीएमओ या पदांकरीता आठवडयाचे दुस-या व चौथ्या गुरुवारी वॉक इन इन्टरव्हुव्दारे नेमणूक देणेकरीता स्थायी स्वरुपात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

निर्णय क्र.४७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आरएमओ/सीएमओची पदे भरणेकरीता वेळोवेळी जाहिरात प्रसिध्द करून मुलाखतीद्वारे नेमणूक देण्यात येते. परंतु आरएमओ/सीएमओ या पदाकरीता शक्यतो एमबीबीएस पदवी नवीन उत्तीर्ण झालेले उमेदवार येत असतात. सदरचे वैद्यकीय अधिकारी ४-६ महिन्यातच पुढील शिक्षणाकरीता अथवा वैयक्तीक कारणास्तव राजीनामा देतात. त्यामुळे जाहिरात देऊन नेमणूका करणे राजीनामा देणे व पुन्हा जाहिरात देऊन नेमणूका करणे ही प्रक्रीया वर्षभर पुन्हा पुन्हा करावी लागते. यावर पर्याय म्हणून श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आरएमओ/सीएमओची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता भरणेकामी आठवडयाचे दुस-या व चौथ्या गुरुवारी वॉक इन इंन्टरव्हयुव्दारे नेमणूक देणेकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद मसुद्याप्रमाणे स्थायी जाहिरात वर्षातुन एकदा दैनिक वर्तमानपत्रात (२ इंग्रजी व २ मराठी भाषेत) व संस्थानचे संकेतस्थळावर स्थायी स्वरूपात जाहिरात प्रसिध्द करणेस व इतर अनुषंगीक बाबींकरीता येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली तसेच प्रशासकीय निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देऊन त्यांना वेळोवेळी व्यवस्थापन समितीने मंजूर केलेले मानधन आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिकारी, ईडीपी मॅनेजर, एस टी/एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजर, पब्लीक रिलेशन मॅनेजर इत्यादी यांना दि.२४/१०/२०२१ ते दि.०९/०६/२०२२ या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिनेसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूक देणेबाबत.

**निर्णय क्र.४७९** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, मॅनेजरर्स व ज्युनिअर बायोमेडीकल इंजिनिअर यांना त्यांचे नेमणूक संपुष्टात येत असल्याचे लगतचे दिनांकापासून ४ दिवस अंतर/सर्व्हिस ब्रेक देऊन पुन्हा ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक/निवासी उपवैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिकारी, मॅनेजरर्स व ज्युनिअर बायोमेडीकल इंजिनिअर यांचेकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्याटप्याने नेमणूक देण्यास मान्यता देण्यात आली. कामकाजाचा अहवाल समाधानकारक नसल्यास नेमणूका देण्यात येऊ नयेत. तसेच नेमणूक देतांना फिजिशियन यांचेव्यतिरीक्त इतर वैद्यकीय अधिका-यांना प्रस्तावातील तक्ता ब मधील स्तंभ क्र ०८ मध्ये नमुद केलेप्रमाणे एकत्रित मानधन आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.१०** श्री साईनाथ रुग्णालयातील सद्यस्थितीला लागु असलेल्या वैद्यकीय सेवा आकारांच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

**निर्णय क्र.४८०** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील सद्यस्थितीला लागु असलेल्या वैद्यकीय सेवा आकारांच्या दरामध्ये वाढ करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव उपसमिती सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.११** मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुन २०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.१,२२,६०,००९/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४८१** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुन २०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी एकुण २७,०२६ रुग्णांकरीता झालेल्या खर्चाची रक्कम रु.१,२२,६०,००९/-मात्रच्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.१२** संस्थान परिसरातील बगीचांची देखभाल व संगोपणाबाबतची कामे यांत्रिकीकरणासह आऊटसोर्स कर्मचा-यांकडून करुन घेणेबाबत.

**निर्णय क्र.४८२** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या बगीचा विभागास यांत्रिकीकरणासह, दुरुस्ती व देखभालीबाबतची बगीचा संदर्भातील लॉन कटींग, रिप कटींग व गवत खूरपणी ही कामे वेळेत पूर्ण करुन घेणेकामी २० महिला व १० पुरुष कर्मचारी आऊटसोर्स पध्दतीने मिळणेकामी विहीत पध्दतीने वार्षिक ई-निवीदा प्रक्रिया राबविणेस व सदर कर्मचा-यांचे वेतनापोटी झोन-२ नुसार किमान वेतनदरानुसार होणारा खर्च +इतर चार्जेस तसेच इतर अनुषंगिक बाबींवर येणा-या अंदाजे रक्कम रु.५५,००,०००/-मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग)

---

**विषय नं.१३** संस्थान परिसरातील विविध ठिकाणच्या बगीचांची मशागत करणेकामी लहान ट्रॅक्टर–२४ HP व अवजारे खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.४८३** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या विविध जमिनींची मशागत करणे तसेच औषध फवारणी करणेकामी ०१ लहान ट्रॅक्टर-२४ HP व सदर ट्रॅक्टरला वापरता येतील अशी अवजारे (नांगर, रोटाव्हेटर, सरीयंत्र) संस्थानचे वाहन विभागामार्फत खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,००,०००/-मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बगीचा विभाग)

---

**विषय नं.१४** रेल्वे विभागाच्या जनभागीदारी धोरणांतर्गत कोपरगाव आणि साईनगर रेल्वे स्टेशन येथे संस्थान मार्फत बगीचा निर्मिती करणेबाबत.

**निर्णय क्र.४८४** यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला शोभेची झाडे लावणेकामी येणा-या रु. १,१८,४५,९२०/- (एक कोटी अठरा लाख पंचेचाळीस हजार नऊशे वीस) मात्र अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मंजूरीसाठी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे पाठविला असता महाराष्ट्र शासनाचे क्र.सासंवि - १०१६/१०५७/प्र.क्र.०८/का.१६ दि. ०१ जून २०१६ रोजीचे विधी व न्याय विभागाचे पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मध्ये वृक्षारोपणाच्या प्रयोजनाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद नसल्याने शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला झाडे लावणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आलेला आहे. त्यामुळे रेल्वे विभागाच्या जनभागीदारी धोरणांतर्गत कोपरगाव आणि साईनगर शिर्डी स्टेशन येथे संस्थान मार्फत बगीचा निर्मिती करणेचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही- बगीचा विभाग)

---

**विषय नं.१६** बेडशीट उशी कव्हरसह खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.४८५** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साई धर्मशाळा विभागाकरीता प्रस्तावात नमुद केल्यानुसार ७००० नग प्रिंटेड बेडशिट उशी कव्हरसह (विभागाचे नाव प्रिंटीगसह) संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२९,४०,०००/-मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-साई धर्मशाळा)

---

**विषय नं.१७** प्रिंटेड बेडशीट उशी कव्हरसह खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.४८६** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता प्रस्तावात नमुद केल्यानुसार ६००० नग प्रिंटेड बेडशिट उशी कव्हरसह (विभागाचे नाव प्रिंटीगसह) संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२५,२०,०००/-मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१८** दि.२५ ऑक्टोंबर,२०२२ रोजी खंडग्रास सुर्यग्रहण (ग्रस्तास्त) व दि.०८ नोव्हेंबर,२०२२ रोजी खग्रास चंद्रग्रहण (ग्रस्तोदित) या कालावधीतील दैनंदिन कार्यक्रमामध्ये प्रथा व परंपरेप्रमाणे कार्यवाही होणेबाबत.

**निर्णय क्र.४८७** यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२५ ऑक्टोंबर,२०२२ रोजी खंडग्रास सुर्यग्रहण (ग्रस्तास्त) व दि.०८ नोव्हेंबर,२०२२ रोजी खग्रास चंद्रग्रहण (ग्रस्तोदित) असल्याने या कालावधीत मंदिरातील दैनंदिन कार्यक्रमामध्ये प्रथा व परंपरेप्रमाणे प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मंदिर विभाग)

---

**विषय नं.२०** माहे मार्च-२०२२ जमा-खर्च तक्याची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.४८८** यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे मार्च-२०२२ मधील जमा-खर्च तक्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.२१ माहे एप्रिल-२०२२ व मे-२०२२ जमा-खर्च तक्याची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.४८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०२२ व मे-२०२२ मधील जमा-खर्च तक्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.२९ श्री साईबाबा पुण्यतिथी-२०२२ मधील उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इ.साठी मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नावे निश्चित करणेबाबत.

निर्णय क्र.४९० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी-२०२२ मधील उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इ.साठी खालील प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नावे निश्चित करण्यात आली.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२२ वीणा,पोथी,फोटो,पाद्यपुजा,रुद्राभिषेक इ. कार्यक्रमाबाबत तक्ता.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| पारंभ दिवस<br>दि.०४/१०/२०२२<br>मंगळवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.४५ | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.ॲड.सुहास आहेर, सदस्य<br>पोथी- मा.श्री.सुनिल शेळके, सदस्य<br>प्रतिमा- मा.श्री.रराहूल कनाल, सदस्य |
| | पहाटे ६.०० | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ - मा.श्री.सुनिल शेळके, सदस्य<br>अध्याय क्र.२ – मा.डॉ.जालिंदर भोर, सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा.श्री.सचिन कोते, सदस्य<br>अध्याय क्र.४ – मा.श्री.सिचन गुजर, सदस्य<br>अध्याय क्र.५ - मा.डॉ.एकनाथ गोंदकर, सदस्य |
| | सकाळी ७.००<br>सायंकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा - मा.ॲड.जगदीश सावंत, उपाध्यक्ष<br>श्रींची पाद्यपूजा - मा.डॉ.जालिंदर भोर, सदस्य |
| मुख्य दिवस<br>०५/१०/२०२२.<br>बुधवार | | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | पहाटे ५.४५ | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा.श्री.सचिन कोते, सदस्य<br>पोथी - मा.श्री.अविनाश दंडवते, सदस्य<br>प्रतिमा- मा.श्री.महेंद्र शेळके, सदस्य |
| | सकाळी ७.००<br>सायंकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.अध्यक्ष महोदय<br>पाद्यपूजा- मा.अनुराधा आदिक, सदस्य |
| | सकाळी ९.०० | भिक्षा झोळी कार्यक्रम – मा.श्रीमती मिना कांबळी, सदस्य |
| | सकाळी १०.३० | आराधना विधी कार्यक्रम- मा.श्री.जयवंतराव जाधव, सदस्य |
| ०६/१०/२०२२<br>गुरुवार | | तृतीय दिवस |
| | सकाळी ७.००<br>सांयकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री.सुरेश वाबळे, सदस्य<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्री.दत्तात्रय सावंत, सदस्य |
| ०७/१०/२०२२<br>शुक्रवार | सकाळी ७.००<br>सांयकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.डॉ.एकनाथ गोंदकर, सदस्य<br>श्रींची पाद्यपूजा- |
| | सकाळी ७.०० | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.मुख्य कार्यकारी अधिकारी |

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३४ संस्थानचे लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी सन २०२२-२३ वर्षाकरीता गाईचे शुध्द तूप खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत.

निर्णय क्र.४९१ सदरचा विषय प्रलंबीत ठेवण्यात आला. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.१ उशिराने सादर झालेल्या कायम कर्मचा-यांच्या वैद्यकीय बिलाचा परतावा करणेबाबत.

निर्णय क्र.४९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय देखभाल नियमावली-१९९९ कलम १३(३) मधील तरतुदीनुसार श्री.धिरज दिलीप जवंजाळ, फार्मासिस्ट यांनी सादर केलेल्या रक्कम रु.१५,५००/-मात्र बिलाच्या रकमेपैकी ८०% रक्कम रु.१२,४००/-मात्र श्री.जवंजाळ यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच रक्कम रु.४०,०००/-पर्यंतच्या वैद्यकीय बिलाची रक्कम आदा करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२ श्री. तुकाराम बाजीराव गव्हाणे, कायम कंत्राटी कर्मचारी (५९८) विद्युत विभाग यांना वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबत.

निर्णय क्र.४९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. तुकाराम बाजीराव गव्हाणे, कायम कंत्राटी कर्मचारी (५९८) विद्युत विभाग यांनी वैद्यकीय देखभाल नियमावली-१९९९ मधील तरतुदीनुसार ९० दिवसामध्ये बिले सादर केलेली नाही. तसेच उपचार घेतलेल्या रुग्णालयांपैकी दोन रुग्णालये संस्थानच्या मान्य यादीत नाही. यापुर्वी दोन कायम कंत्राटी (५९८) कर्मचा-यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०२.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११० अन्वये नामंजूर करण्यात आलेला आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन श्री. तुकाराम बाजीराव गव्हाणे, कायम कंत्राटी कर्मचारी (५९८) विद्युत विभाग यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबतचा प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.३ श्री.योगेश बाळकृष्ण गेठे, ई.एन.टी.सर्जन,श्री साईबाबा हॉस्पिटल (प्रत्यक्ष काम-श्री साईनाथ रुग्णालय) यांचा दि.१२.०५.२०२२ रोजीचा शिक्षेविरुध्द अपिल अर्ज.

निर्णय क्र.४९४ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.४ सौ.मनिषा स्टिफन आवारे, कंत्राटी परिचारीका (११ महिने कालावधीकरीता) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबतचा अर्ज.

निर्णय क्र.४९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय देखभाल नियमावली-१९९९ मध्ये कंत्राटी कर्मचा-यांना वैद्यकीय बिलाचा परतावा देण्याची तरतुद नसल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०२.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१११ अन्वये यापुर्वी सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन सौ.मनिषा स्टिफन आवारे, कंत्राटी परिचारीका (११ महिने कालावधीकरीता) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबतचा प्रस्ताव नामंजुर करण्यात आला.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे एम.पी.सी.टी.हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयाचा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे एम.पी.सी.टी.हॉस्पिटल, मुंबई यांनी संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे एम.पी.सी.टी.हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयाचा संस्थानकडून वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **श्री साईबाबा संस्थानचे कायम व कायम कंत्राटी कर्मचारी गणवेश शिलाईसह व साडया ब्लाऊज पीससह खरेदीकामी प्राप्त न्युनतम दर माहितस्तव सादर.**

**निर्णय क्र.४९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे कायम व कायम कंत्राटी कर्मचारी गणवेश शिलाईसह व साडया ब्लाऊज पीससह खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.चंपालाल ॲन्ड कंपनी, नाशिक यांचे रक्कम रु.९७,०६,७२७/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतले ठराव**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७**

**ठराव क्र.४९८** **मा.श्री.अविनाश दंडवते, समिती सदस्य यांचे बंधु राजेंद्र भानुदास दंडवते यांचे दुःखद निधन झाले आहे. तसेच आमदार मा.विनायकराव मेटे यांचे अपघाती निधन झाले आहे. त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८**

**ठराव क्र.४९९** **मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०४.२०२२ रोजीचे सभेतील विषय नं.०२-दि.०६.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. यामधील उपसमिती सभेचे विषयसुची मधील खालील विषय स्थगीत ठेवण्यात आलेले होते.**

**१. श्री साईबाबा संस्थानतर्फे कॅन्सर युनिट सुरु करणेबाबत.**

**२. रुग्णालयामध्ये नविन डॉक्टरांची नियुक्ती करणेपुर्वी त्यांना द्याव्या लागणा-या प्रोत्साहन भत्त्याबाबत निर्णय घेणेकरीता विश्वस्त व वैद्यकिय अधिका-यांची संयुक्त कमिटी स्थापन करणेबाबत.**

**३. श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल यातील दराबाबत विचार करणेबाबत.**

**६. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नव्याने नर्सिंग कॉलेज (B.Sc.Nursing) सुरु करणेस व त्या अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**७. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत (MBBS) वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणेस व त्यानुषंगिक येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**९. सर्व्हे नं.१२५ व १२६ मध्ये नियोजित हॉस्पिटल व मेडीकल कॉलेज उभारणेकामी संयुक्त नकाशा करुन लेआऊट सादर करणेबाबत.**

**आजचे सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त विषयांचे बाबतीत दि.०६.०४.२०२२ रोजीचे मा.उपसमिती सभेमध्ये केलेल्या शिफारशी मान्य करण्यात येऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.९
ठराव क्र.५०० श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मॅकेनिकल), वाहन विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी झालेल्या ठरावामध्ये तफावत दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी झालेल्या आर्थिक नुकसानीचे संबधीत सर्व कर्मचा-यांची समग्र चौकशी करुन सविस्तर फेर चौकशी अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१०
ठराव क्र.५०१ श्री.राहुल रामचंद्र इंगवले हे विद्युत विभागात मदतनीस या पदावर कार्यरत आहेत. श्री.इंगवले यांनी दि.२१.०५.२०२२ रोजी रात्रौ ९.०० वा. साईधर्मशाळा भक्तनिवास (साईआश्रम भाग-०२) या ठिकाणी असलेल्या आर ब्लॉकमधील रुम नंबर ०३ मधील विद्युत विभागाचे सब स्टोअरमधून एल.ई.डी. टयुब लाईटचे तसेच एल.ई.डी.बल्बचे अंदाजे रक्कम रु.२२,५००/- इतक्या किंमतीचे मटेरियल कोणास काही एक न कळविता स्वतःच्या पदाचा गैर वापर करुन स्वतःच्या फायदयाकरिता चोरुन नेण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री.इंगवले यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ संस्थानचे सेवेतून सेवा निलंबित केले असुन त्यांना विभागीय चौकशी करणेकरीता अभिकथन/दोषारोप पत्र बजाविणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापी सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असुन श्री.इंगवले यांना कायमस्वरुपी नोकरीतुन बडतर्फ करणेबाबत नियमानुसार प्रक्रिया सुरु करण्यात यावी, अशी सुचना करण्यात आली.

तसेच सदर प्रकरणी घटना घडल्याचे दोन दिवसानंतर विद्युत विभागामार्फत शिर्डी पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविल्याचे तसेच विद्युत विभागाचे सब स्टोअरमधील मटेरिअलचे डेडस्टॉकमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास येते. याबाबत विद्युत विभागाचे प्रमुख यांचेवर कर्तव्यात कसुर केल्याबद्दल चौकशी सुरु करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.११
ठराव क्र.५०२ अहमदनगर जिल्हा रस्सीखेच संघटना व महाराष्ट्र राज्य रस्सीखेच संघटनेच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ ते १७ ऑगस्ट २०२२ दरम्यान श्री साईबाबा संस्थानचे नविन शैक्षणिक संकुलातील मैदानावर राज्यस्तरीय रस्सीखेच स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत संस्थानचे शैक्षणिक संकुलातील खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन सुवर्ण पदक व कास्यपदक पटकावले. या यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक व प्राचार्य यांचे मा. व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व मा.सदस्य तसेच संस्थानचे अधिकारी यांनी अभिनंदन केले. (कार्यवाही-शैक्षणिक संकुल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१२
ठराव क्र.५०३ संस्थानचे रुग्णालयासंबधी दुरुस्ती, मेंन्टनन्स, रिपेअरिंग बाबतचा अंदाजपत्रकासह सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३
ठराव क्र.५०४ संस्थानचे रुग्णालयाकरीता कमी असलेले कर्मचारी नर्स, मेट्रन, फार्मासिस्ट, पॅरामेडीकल स्टाफ इत्यादी आऊटसोर्स पध्दतीने ठेकेदारामार्फत घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

अजेंडयावरील वेळेअभावी प्रलंबित राहिलेले विषय

| | |
|---|---|
| विषय नं.१५ | बॅगेज स्कॅनर दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी आलेल्या दरांबाबत चर्चा वाटाघाटीव्दारे निर्णय होणेबाबत. |
| विषय नं.१९ | आयकर विषयक विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण करणे व अनुशंगिक कामकाजाकरीता करसल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेबाबत. |
| विषय नं.२२ | आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ अखेर रु.३०९ कोटी अखर्चित उत्पनाचा विनियोग करणेबाबत. |
| विषय नं.२३ | संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन मूल्यांकन करणेकामी नेमणेत आलेल्या मूल्यांकनकारांना (Gold-Silver Valuer) मुदतवाढ देणेबाबत. |
| विषय नं.२४ | संस्थान नियुक्त तांत्रिक सल्लागार M/s DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांचे प्राप्त अभिप्रायानुसार नविन दुरध्वनी यंत्रणेचे Service/Support बाबत तांत्रिक सल्लागार व पुरवठाधारक यांचेशी समक्ष चर्चा होऊन लेखापरिक्षणाच्या दृष्टीने प्रस्तावातील मुद्दा क्र."A" ते "G" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.२५ | संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम–२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत. |
| विषय नं.२६ | दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन मिळणेबाबतचे अर्जावर निर्णय होणेबाबत. |
| विषय नं.२७ | संस्थानचे हैद्राबाद, बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व मुदतवाढीबाबत. |
| विषय नं.२८ | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव–२०२२ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३० | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२२ आयोजित करावयाच्या कीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चित करणेबाबत. |
| विषय नं.३१ | श्री.शरद कचरु गोडगे, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत. |
| विषय नं.३२ | संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनीत्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदी कामी केलेल्या कार्यवाही बाबत. |
| विषय नं.३३ | श्री साईबाबा महाविद्यालय–प्राध्यापकांना मुदतवाढ देणेबाबत. |
| विषय नं.३५ | २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांचेकडून दिनांक १०.०८.२०२२ रोजी प्राप्त झालेल्या ई-मेलवर चर्चा होऊन निर्णयबाबत. |

विषय नं.३६ श्री साईप्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन यंत्रणा व आय.टी.विभाग सर्व्हर प्रेसिजन ए.सी.यंत्रणा नवीन बसविणेकामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणेकरीता मे.अपुर्वा सर्व्हिस कन्सलटंट, ठाणे यांचे न्युनतम दर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत माहितीस्तव सादर करणेबाबत.

---

विषय नं.३७ संस्थानचे सर्व भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट तीन वर्ष कालावधी करीता देणेकामी ई-निविदेतील मे.फोनिक्स इलेव्हेटर्स (इं) प्रा.लि.पुणे यांचे निम्नतम दर मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे माहितीसाठी सादर.

---

विषय नं.३८ दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये वातानुकुलित (Air conditioner) यंत्रणा बसविणेकामी ई-निविदेतील मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे निम्नतम दर मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे माहितीसाठी सादर.

---

विषय नं.३९ श्री साई प्रसादालयाकरीता नविन आटा युनिट खरेदी करणेकामी ई निविदेतील मे.हिंदुस्थान ॲग्रो इंजिनिअरींग, वेरावल, गुजरात यांचे निम्नतम दर मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे माहितीसाठी सादर .

---

विषय नं.४० संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराची निविदा माहितीस्तव सादर.

---

विषय नं.४१ संस्थानमार्फत साजरे करणेत येणारा पुण्यतिथी उत्सव–२०२२ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था उभारणे व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.९,९३,०००/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चास व सदर कामासाठी दरपत्रके मागविणेस मान्यता देणे.

---

विषय नं.४२ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील संस्थानचे भांडार परिसरात वेअरहाऊस पध्दतीचे गोडाऊन बांधणेसाठी आर्किटेक्ट नेमणूकीबाबत.

---

विषय नं.४३ श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पाचे लेबर कॅम्प येथे दि.१३.०८.२०२२ पासून घडलेल्या घटनांबाबत व प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत.

---

विषय नं.४४ मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ पैकी मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे बांधकाम करणे कामाचे अंतिम बील व जादा रकमेच्या मागणीबाबत ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांना आदा करणेबाबत.

---

विषय नं.४५ संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर उपलब्ध करणेबाबत.

---

विषय नं.४६ संस्थानची नावे, बोधचिन्हे, अधिकृत वेबसाईट, प्रकाशने इ.चे Trademark व CopyRight बाबतची कार्यवाही करणेकामी या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.

---

विषय नं.४७ श्री साईबाबा संस्थानचे नावाशी साम्य असणा-या वेबसाईटव्दारे देणगी जमा करणारे तसेच वेबसाईट, फेसबुक, इन्स्टाग्राम यावर साई नावाने असलेल्या अकाऊंटबाबत.

---

विषय नं.४८ भारतीय टपाल विभागाच्या Joint Parcel Product धोरणांतर्गत पोस्टाने लाडु प्रसाद विक्री तसेच कोपरगाव व शिर्डी रेल्वे स्टेशनवर लाडु प्रसाद विक्री काऊंटर सुरु करणेबाबत.

**निर्णय क्र.५०५** **आजचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील अजेंडयावरील विषय नं.१५,१९, २२ ते २८, ३० ते ३३, ३५ ते ४८ हे विषय वेळेअभावी प्रलंबित राहिलेले असल्याने व्यवस्थापन समितीची कार्यपध्दती आणि तिचे कामकाज चालवणे विनियम-२०१३ मधील कलम (८) नुसार मा.व्यवस्थापन समितीची पुढील सभा सर्वसंमतीने तारीख व वेळ निश्चित करुन प्रलंबित राहिलेले विषय अजेंडयानुसार घेण्यात यावेत. त्याकरीता स्वतंत्ररित्या नोटीस काढण्याची आवश्यकता नाही. असे ठरले.**

---

**वरील निर्णय/ठराव क्र.४७१ ते ५०५ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ८.१५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**